# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या (तातडीच्या) १८३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.१६ ऑगस्ट, २०२४ दुपारी ०२:०० वा.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १८३ वी (तातडीची) बैठक बुधवार, दि.१४/०८/२०२४ रोजी सायं. ०४:०० वा. Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे मा.कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. परंतु, बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सदरच्या बैठकीचे कामकाज शुक्रवार, **दि.१६/०८/२०२४ रोजी दुपारी ०२:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात प्रत्यक्ष व ऑनलाईन पध्दतीने पुढे पार पडले.

सदर बैठकीस प्रत्यक्ष व ऑनलाईन पध्दतीने खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १७) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे, प्र. वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली होती, त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०१] | १. दि. १९ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि. २४ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८० व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>३. दि.२७ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८१ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>४. दि.०२ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८२ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | **१. दि. १९ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते कायम करण्यात आला.** | |
| | • पान क्र.४१ येथील विषय क्र.२१(७) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | आस्थापना विभाग |
| | प्रस्तुत विद्यापीठामध्ये "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र" मंजूर करण्यात आले असून सदर अध्यासन केंद्रासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे कृती समिती गठीत करण्यात आली.<br>तसेच सदर समितीने अध्यासन केंद्रासाठी निधी उभारण्यास ही प्रयत्न करावे असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | समिती सदस्यांची नांवे | पदनाम |
|---|---|---|
| १) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | अध्यक्ष |
| २) | प्रा. (डॉ.) भगवान आदटराव | सदस्य |
| ३) | डॉ. टी. एस. मोरे | सदस्य |
| ४) | डॉ. एम. आर. कांबळे | सदस्य |
| ५) | डॉ. सारीपुत्र तुपेरे | सदस्य |
| ६) | डॉ. दिगंबर झोंबाडे | सदस्य |
| ७) | डॉ. चंद्रकांत चव्हाण | सदस्य |
| ८) | डॉ. पी. एन. कोळेकर | सदस्य |
| ९) | प्रा. (डॉ.) गौतम सुबण्णा कांबळे | समन्वयक |

| | | |
|---|---|---|
| | दुरुस्त केलेला ठराव<br>प्रस्तुत विद्यापीठामध्ये "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र" मंजूर करण्यात आले असून सदर अध्यासन केंद्रासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे कृती समिती गठीत करण्यात आली.<br>तसेच सदर समितीने अध्यासन केंद्रासाठी निधी उभारण्यास ही प्रयत्न करावे असे सर्वानुमते ठरले. | आस्थापना विभाग |

| अ.क्र. | समिती सदस्यांची नांवे | पदनाम |
|---|---|---|
| १) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | अध्यक्ष |
| २) | प्रा. (डॉ.) गौतम सुबण्णा कांबळे | समन्वयक |
| ३) | डॉ. टी. एस. मोरे | सदस्य |
| ४) | डॉ. एम. आर. कांबळे | सदस्य |
| ५) | डॉ. सारीपुत्र तुपेरे | सदस्य |
| ६) | डॉ. मारुती घंटेवाड | सदस्य |
| ७) | डॉ. चंद्रकांत चव्हाण | सदस्य |
| ८) | डॉ. पी. एन. कोळेकर | सदस्य |
| ९) | डॉ. सिद्राम सलवदे | सदस्य |
| १०) | डॉ. दिगंबर शिवाजी वाघमारे | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | २. दि. २४ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८० व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला. | |
| | ३. दि.२७ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८१ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला. | |
| | ४. दि.०२ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८२ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **Sector Skill Council of India व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (वाणिज्य व व्यवस्थापन संकुल) यांच्याबरोबर सामंजस्य करार करण्यास व कराराचा मसुद्याची बाब पुनश्च: विचारार्थ**<br>टिपणी: वाणिज्य व व्यवस्थापन संकुलामध्ये B.Com. (BFSI) हा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अधिष्ठाता मंडळ, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषद यांची मान्यता मिळालेली आहे. Sector Skill Council of India व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर (वाणिज्य व व्यवस्थापन संकुल) यांच्याबरोबर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून B.Com. (BFSI) अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत सामंजस्य करार करावयाचा आहे. या करारामुळे B.Com. (BFSI) या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व विद्यापीठाला खालील फायदे होऊ शकतात.<br>१. कौशल्य आधारित अभ्यासक्रम<br>२. प्रत्येक विद्यार्थ्याला ०१ वर्षाची Internship / Apprenticeship with Stipend<br>३. NEP-२०२० नुसार अभ्यासक्रम<br>४. अभ्यासक्रम यशस्वीरित्या पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांस त्यांच्या योग्यतेनुसार Placement<br>५. Online किंवा Offline Training<br>६. विद्यार्थी व शिक्षकांना Skill Courses चे अध्ययन साहित्याची उपलब्धता<br>सदर सामंजस्य कराराचा मसुदा नवोपक्रम संशोधन व साहचर्य मंडळ या विभागाकडील MOU Committee कडून तपासून घेतला असून सदर करार करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ (झ) नुसार दि.१९/०७/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये मान्यतेसाठी सादर केला असता, खालीलप्रमाणे ठराव पारित झालेला आहे.<br>ठराव क्र. ४ - Sector Skill Council of India व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (वाणिज्य व व्यवस्थापन संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराच्या मसुद्यामध्ये दुरुस्त्या करुन सदरचा विषय पुनश्च: सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br>वरील ठरावानुसार Sector Skill Council of India व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (वाणिज्य व व्यवस्थापन संकुल) यांच्यासोबत करावयाच्या सामंजस्य कराराच्या मसुद्यामध्ये दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत.<br>सबब, सदर सामंजस्य कराराचा मसुदा व कराराची बाब पुनश्च: विचारार्थ. | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल |
| ठराव: | **Sector Skill Council of India व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन संकुल यांच्यामध्ये B.Com. (BFSI) हा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सामंजस्य करार करण्यास व कराराचा मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **School of Data Science and Business Intelligence (SDBI), Mumbai व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याबरोबर सामंजस्य करार करण्यास व कराराचा मसुद्याची बाब पुनश्च: विचारार्थ**<br>टिपणी: School of Data Science and Business Intelligence (SDBI), Mumbai व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (संगणकशास्त्र संकुल) यांच्या सोबत सामंजस्य कराराचा (MoU) च्या मसुद्यास मान्यता मिळणेकरिता दि.१९/०७/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीमध्ये ठराव क्र.२१(२) अन्वये सादर करण्यात आलेला होता.<br>School of Data Science and Business Intelligence (SDBI), Mumbai यांच्या समवेत सामंजस्य कराराचा मसुद्यामध्ये दुरुस्त्या करुन सदरचा विषय पुनश्च सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.<br>व्यवस्थापन परिषदेत झालेल्या ठरावानुसार सामंजस्य कराराच्या (MoU) मसुद्यातील सर्व दुरुस्त्या MoU Cell ने सुचविल्याप्रमाणे केलेल्या आहेत.<br>सबब, सदर सामंजस्य कराराचा मसुदा व कराराची बाब पुनश्च विचारार्थ. | संगणकशास्त्र संकुल |
| ठराव: | **School of Data Science and Business Intelligence (SDBI), Mumbai व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुलामध्ये खालीलप्रमाणे Data Science Programs and Cybersecurity Programs सुरु करण्यासाठी सामंजस्य करार करण्यास व कराराचा मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| Sr. No. | Programme Name | Duration | Student Intake |
|---|---|---|---|
| 1. | B.Sc. Data Science and Business Analytics | 3/4 Years | 60 |
| 2. | M.Sc. Data Science and Big Data Analytics | 2 Years | 40 |
| 3. | B.Tech. Data Engineering and Artificial Intelligence | 4 Years | 60 |
| 4. | MBA in Business Analytics | 2 Years | 40 |
| 5. | B.Sc. Cybersecurity and Information Security | 3/4 Years | 60 |
| 6. | M.Sc. Cybersecurity Management and Policy | 2 Years | 40 |
| 7. | B.Tech. Cybersecurity and Digital Forensics | 4 Years | 60 |
| 8. | M.Tech. Cybersecurity and Digital Forensics Syllabus | 2 Years | 40 |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **Life Sciences Sector Skill Development Council (LSSSDC) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराचा मसुदा व करार करण्याची बाब पुनश्च: विचारार्थ.**<br>टिपणी: Life Sciences Sector Skill Development Council (LSSSDC) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराच्या MoU च्या मसूद्यास मान्यता देण्याकरिता उपरोक्त संदर्भान्वये सदरचा विषय दि.१९/०७/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषद ठराव क्र. ७ अन्वये सादर करण्यात आलेला होता.<br>व्यवस्थापन परिषदेने Life Sciences Sector Skill Development Council (LSSSDC) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराच्या मसुद्यामध्ये दुरुस्त्या करुन सदरचा विषय पुनश्च: सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.<br>व्यवस्थापन परिषदेने सुचविल्याप्रमाणे सामंजस्य कराराच्या MoU चा मसुद्यातील सर्व दुरुस्त्या करुन पुन्हा MoU Cell मध्ये सादर केलेला होता. MoU Cell च्या तपासणीनंतर सदर Cell च्या बैठकीत केलेल्या दुरुस्ती प्रमाणे सदरचा विषय पुनश्च: व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीस सादर करण्याची बाब पुनश्च: विचारार्थ. | जैवविज्ञान संकुल |
| ठराव: | **Life Sciences Sector Skill Development Council (LSSSDC) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील जैवविज्ञान संकुल यांच्यामध्ये B.Sc. in Pharmaceutical Manufacturing & Quality - 3 Years हा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सामंजस्य करार करण्यास व कराराचा मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास Biotechnology Industry Research Assistance Council (BIRAC) कडून Empowering youth for Undertaking Value added Innovative Translational Research (EYUVA) ला मंजूर झालेला प्रकल्पासाठी अनुदान म्हणून रु.२.६६ कोटी या तरतुदीमधून प्रकल्प नियमाप्रमाणे वेळोवेळी खरेदी व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब विचारार्थ. | जैवविज्ञान संकुल |

टिपणी: Biotechnology Industry Research Assistance Council (BIRAC) कडून दि.०३/०५/२०२४ रोजीच्या करार पत्रान्वये "Empowering Youth for Undertaking Value Added Innovative Translational Research (EYUVA)" करीता रु.२.६६ कोटीची संशोधन प्रकल्प प्रा. डॉ. विकास पाटील यांना मंजूर झालेला आहे. यानुसार प्रस्तुत विद्यापीठ दि.०७/०६/२०२४ रोजीच्या आदेशान्वये एकूण अनुदान रु.२.६६ कोटी पैकी प्रथम हप्ता रु.११४.८० लाख इतकी रक्कम विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. या प्रकल्पातंर्गत BIRAC या संस्थेने मंजूरी आदेशामध्ये Budget Break-up for ३ years दिलेला आहे. तरी खालीलप्रमाणे BIRAC Budget Break-up (Year wise) दिलेला आहे.

| | Budget head | Total for 3 Years (INR in Lakhs) |
|---|---|---|
| A. | Non-Recurring head-Fixed/One Time Cost | Rs.40.00 |
| B. | Recurring head-Annual Cost<br>B.1. EYUVA Centers Operational Costs | Rs.67.50 |
| | B.2. Fellowship | Rs.159.00 |
| | Total Support including Fellowship A+B1+B2 | Rs.2.66 (कोटी) |

तरी वरील अनुदान BIRAC "Empowering Youth for Undertaking Value Added Innovative Translational Research (EYUVA)" या संशोधन प्रकल्पाकरीता वरीलप्रमाणे खर्च वेळेत करुन व त्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधीत संस्थेकडे सादर करणे आवश्यक आहे.

सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास Biotechnology Industry Research Assistance Council (BIRAC) कडून Empowering youth for Undertaking Value added Innovative Translational Research (EYUVA) ला मंजूर झालेला प्रकल्पासाठी अनुदान म्हणून रु.२.६६ कोटी या तरतुदीमधून प्रकल्प नियमाप्रमाणे वेळोवेळी खरेदी व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब विचारार्थ.

| | | |
|---|---|---|
| ठराव: | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास Biotechnology Industry Research Assistance Council (BIRAC) कडून Empowering youth for Undertaking Value added Innovative Translational Research (EYUVA) या प्रकल्पाकरिता मंजूर झालेले अनुदान रु.२.६६ कोटी या तरतुदीमधून प्रकल्प नियमाप्रमाणे वेळोवेळी विविध खरेदी व खर्च करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०६] | **डॉ. मुकुंद गणपत माळी, सहायक प्राध्यापक, रसायनशास्त्र संकुल यांना विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित शिक्षकांना लागू असलेले परिनियम क्र. २७२ (B)(d) नुसार दि.०१/१०/२०२४ ते ३०/०९/२०२५ अशी एकूण एक वर्षाची वेतनी अध्ययन रजा (Study Leave) मंजूर करणेची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: डॉ. मुकुंद गणपत माळी, सहायक प्राध्यापक, रसायनशास्त्र संकुल यांनी दि.०२/०८/२०२४ रोजीच्या अर्जास अनुसरुन कळविले आहे की, दक्षिण कोरिया सरकारच्या राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठानने त्यांना ब्रेन-पूल प्रोग्राम प्रदान केला आहे. ज्यासाठी त्यांनी आवेदनपत्र सादर करणेपूर्वी प्रशासनाची रितसर परवानगी घेतली होती. त्यामुळे डॉ. मुकुंद माळी यांना दक्षिण कोरिया सरकारने दि.०१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ या कालावधीत नियोजित कार्यक्रमासह, निमंत्रित शास्त्रज्ञ म्हणून त्यांच्या कार्यक्रमात सामील होण्यासाठी Yonsei University कडून औपचारिक निमंत्रण मिळाले आहे.<br><br>या संशोधनाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी विद्यापीठाच्या नियमानुसार दि.०१/१०/२०२४ ते ३०/०९/२०२५ या कालावधीसाठी अभ्यास रजा मंजूर व्हावी, अशी विनंती केली आहे. सदर अर्जावर संबंधित संकुलाच्या प्र. संचालकांनी It is strongly recommended या शेऱ्यानिशी या विभागास अग्रेषित केले आहे. याबाबत प्रस्तुत कार्यालयाकडून दि.०७/०८/२०२४ रोजी सर्वंकष सादरीकरण केले असता, सदर सादरीकरणावर मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेस विषय ठेवण्यास मान्यता प्रदान केली आहे.<br><br>डॉ. मुकुंद गणपत माळी हे विद्यापीठ परिसर रसायनशास्त्र संकुलात खुल्या प्रवर्गातून सहायक प्राध्यापक या नियमित पदावर कायम आस्थापनेवर दि. १६/०२/२०१६ पासून कार्यरत आहेत. त्यांना या कार्यालयाच्या दि. ०४/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये Post Doctoral Fellowship साठी South Korea येथे अर्ज करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.<br><br>विद्यापीठ परिसरात कार्यरत नियमित शिक्षकांना लागू असलेले परिनियम क्र. २७२(B)(d) (i to xi) अन्वये डॉ. एम. जी. माळी हे अध्ययन रजेसंदर्भातील सर्व अटी पूर्ण करतात.<br><br>सबब, उपरोक्त परिनियमातील मुद्दा क्र. Iv नुसार, डॉ. एम. जी. माळी यांचेकडून रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर ते इतर विद्यापीठातील वा इतर तत्सम ठिकाणी परिक्षक म्हणून नियुक्ती स्वीकारणार नाहीत तसेच त्यांच्या अध्ययन रजेच्या कालावधीत कोणतेही पाठयपुस्तक लिहिणार नाहीत वा मार्गदर्शन करणार नाहीत. मुद्दा क्र. v नुसार डॉ. एम. जी. माळी यांनी सदर अध्ययन कालावधीत सेवेचा राजीनामा दिल्यास अथवा सदर संशोधन कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण न केल्यास जर ते त्याबाबतचे स्पष्टीकरण न देऊ शकल्यास त्यांना सदर कालावधीत आदा करण्यात आलेला पगार वार्षिक ६% व्याजदराने विद्यापीठात भरणा करणेबाबत या अटीच्या अधीन राहून आणि नियमानुसार त्यांच्या वेतनातील T.A. वगळता अध्ययन रजा कालावधीतील पूर्ण वेतन विभागीय सहसंचालक कार्यालयामार्फत आदा करण्यास व परिनियम क्र. २७२ (B)(d) नुसार दि.०१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ या कालावधीतील पगारी अध्ययन रजा मंजूर करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **डॉ. मुकुंद गणपत माळी, सहायक प्राध्यापक, रसायनशास्त्र संकुल यांना परिनियम क्र. २७२ (B)(d) नुसार दि.०१/१०/२०२४ ते ३०/०९/२०२५ अशी एकूण एक वर्षाची वेतनी अध्ययन रजा (Study Leave) शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून मंजूर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br><br>**तसेच, डॉ. मुकुंद गणपत माळी यांच्या अध्ययन रजा कालावधीत पूर्णवेळ/तासिका तत्वावर एक शिक्षक नियुक्त करण्यास ही सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०७] | MKCL, ICTRD, या सॉफ्टवेअर फॉर्म सोबत आवश्यकतेनुसार AMC करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: सध्या प्रस्तुत विद्यापीठामध्ये MKCL, ICTRD सॉफ्टवेअर वापरात आहेत. या सॉफ्टवेअरमधील विद्यार्थ्यांना गुणपत्रक, लेजर व इतर आवश्यक माहिती देण्यासाठी तांत्रिक अडचणी येत आहेत. त्यामुळे या सॉफ्टवेअर मधील डेटा एकाच सॉफ्टवेअर मध्ये घेऊन विद्यापीठामध्ये एकच सॉफ्टवेअर चालू करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठ व Edulab educational Exchange Pvt Ltd या सॉफ्टवेअर कंपनीबरोबर करार करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर Edulab educational Exchange Pvt Ltd या फर्मला सॉफ्टवेअरचा डेटा देण्यात आलेला आहे. सदर Edulab सॉफ्टवेअर मधून डेटा Fetch करण्याची कार्यवाही चालू असून त्यांच्याकडून डेटा होईपर्यंत विद्यार्थ्यांच्या मागणी नुसार मार्कशीट, लेजर इ. माहिती देण्यासाठी सध्या MKCL, ICTRD सॉफ्टवेअर सोबत आवश्यकतेनुसार ३ महिने, ६ महिने, १ वर्ष या कालावधी करिता AMC करुन सॉफ्टवेअर चालू करणे आवश्यक आहे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना आवश्यकते नुसार माहिती देता येईल. MKCL साठी तीन महिन्यांकरिता AMC रक्कम रुपये १,६०,५०८/- + GST (अक्षरी रुपये एक लाख सहा हजार पाचशे आठ फक्त अधिक जीएसटी) तसेच ICTRD या सॉफ्टवेअर सोबत तीन महिन्यांकरिता AMC रक्कम रुपये ६०,०००/- + GST (अक्षरी रुपये साठ हजार अधिक जीएसटी) इतका खर्च व सदरचा विषय सादर.<br>वरीलप्रमाणे कंपनी सोबत AMC करण्याची बाब परीक्षा व मूल्यमापन मंडळ बैठकीत सादर केला असता खालीलप्रमाणे ठराव पारित झालेला आहे. ठराव: "विद्यार्थी च्या हिताच्या अनुंषगाने तसेच परीक्षा विभागामार्फत डेटाची पडताळणी करण्या करिता MKCL, ICTRD या दोन सॉफ्टवेअर Company सोबत सुरुवातीस ३ महिने व आवश्यकतेनुसार सहा महिने किंवा एक वर्ष या कालावधीकरिता AMC करण्याकरिता सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली".<br>सबब, MKCL, ICTRD या सॉफ्टवेअर फर्म सोबत आवश्यकतेनुसार AMC करण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |
| ठराव: | **MKCL, ICTRD या सॉफ्टवेअर फर्म सोबत सुरुवातीस ३ महिने AMC करण्यास तसेच आवश्यकतेनुसार सदर AMC १ वर्षापर्यंत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०८] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१४/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठास अधिष्ठातांची दोन पदे मंजूर झाले असून त्यापैकी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा हे पद डॉ. विकास कदम यांच्या कार्यमुक्तीने दि.१४/०९/२०२१ पासून रिक्त आहे. तसेच सदर पदभरती करणेकामी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि.०३/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिलेली आहे.<br>उक्त बाब विचारात घेता, अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाची जाहिरात दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व उर्दु भाषेतील इन्कलाब वर्तमानपत्राच्या दि.२५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, लोकसत्ता वेस्टर्न पॅकेजच्या दि.२५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, प्रस्तुत विद्यापीठाच्या sus.ac.in व महाराष्ट्र शासनाच्या Maharashtra.gov.in संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.२९/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये प्रसिध्द होणार आहे.<br>सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.<br>• महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) "व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक"<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत पुनश्च: सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०९] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१४/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठास अधिष्ठातांची दोन पदे मंजूर झाले असून त्यापैकी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा हे पद रिक्त आहे. तसेच सदर पदभरती करणेकामी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि.०३/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिलेली आहे.<br>उक्त बाब विचारात घेता, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाची जाहिरात दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व उर्दु भाषेतील इन्कलाब वर्तमानपत्राच्या दि.२५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, लोकसत्ता वेस्टर्न पॅकेजच्या दि.२५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, प्रस्तुत विद्यापीठाच्या sus.ac.in व महाराष्ट्र शासनाच्या Maharashtra.gov.in संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.२९/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये प्रसिध्द होणार आहे.<br>सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.<br>• महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) "व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक"<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत पुनश्च: सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१०] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०२(२) (छ) मधील तरतुदीनुसार संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.०८/०५/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठास संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र हे शिक्षकीय संवर्गातील संविधिक पद मंजूर झाले असून सदर पदभरती करण्यास नमूद शासन निर्णयान्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे.<br>उक्त बाब विचारात घेता, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदाची जाहिरात दैनिक लोकमत, दैनिक सकाळ व उर्दु भाषेतील इन्कलाब वर्तमानपत्राच्या दि.२५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, लोकसत्ता वेस्टर्न पॅकेजच्या दि.२५/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.२९/०७/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या sus.ac.in व महाराष्ट्र शासनाच्या Maharashtra.gov.in संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.<br>सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.<br>• महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (२) (छ) "व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक प्राचार्य"<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एका प्राचार्याचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०२ (२) (छ) मधील तरतुदीनुसार संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ). | आस्थापना विभाग |
| ठराव: | **सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत पुनश्च: सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [११] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा शुल्कामध्ये प्रत्येक वर्षी नैसर्गिकरित्या १०% वाढ करण्याबाबतचा निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्विकारुन व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: दि.२९९/०७/२०२४ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमध्ये परीक्षा शुल्कामध्ये प्रत्येक वर्षी नैसर्गिकरित्या १०% वाढ करण्याबाबत खालील ठराव पारित झालेला आहे.<br>"प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता भासते. त्याअनुषंगाने सद्यस्थितीत उपलब्ध होणारा निधी विविध प्रशासकीय कामांसाठी पुरेसा होत नसल्याने, प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा शुल्कामध्ये प्रत्येक वर्षी नैसर्गिकरित्या १०% वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली."<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा शुल्कामध्ये प्रत्येक वर्षी नैसर्गिकरित्या १०% वाढ करण्याबाबतचा निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्विकारुन व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह पुनःश्च सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१२] | **विद्यापीठाच्या संकुलातील विद्यार्थ्यांसाठी वार्षिक नियतकालिका स्पर्धा सुरु करणे महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकेचे शुल्क लागू करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संलग्न महाविद्यालयांमध्ये नियतकालिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येवून सदर स्पर्धेत संलग्न महाविद्यालये सहभागी होत असतात. महाविद्यालयाप्रमाणेच विद्यापीठ संकुलात सन २०२४-२५ या वर्षापासून नियतकालिका स्पर्धा आयोजित करण्याबाबत मा.कुलगुरुमहोदय यांनी मान्यता दिली असून सदर नियतकालिका तयार करण्याच्या अनुषंगाने सर्व संकुलातून प्राप्त झालेल्या मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतून विविध लेख, कविता, चारोळी, विनोद असे विविध लेखन साहित्य विद्यार्थ्यांकडून एकत्रित जमा करुन उत्तम असलेल्या सर्व लेखन साहित्याची छपाई करण्यात येणार असून त्यासाठी अंदाजे रु.१,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्चासाठी विद्यापीठाकडून आर्थिक तरतुदीची आवश्यकता असून विद्यापीठ संकुलात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यांकडून नियतकालिका शुल्क म्हणून आकारण्यात येणारी रक्कम ठरविण्याची बाब विचारार्थ. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव: | **विद्यापीठ संकुलामध्ये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून नियतकालिका स्पर्धा सुरु करण्यास व महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकेचे शुल्क लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [१३] | **आंतर महाविद्यालयीन क्रीडा परिषदेचे यजमान पद स्वीकारलेल्या महाविद्यालयास सन २०२४-२५ पासून विद्यापीठाचे अनुदान रु.२५,०००/- ऐवजी रु.५०,०००/- अनुदान देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: दरवर्षी अखिल भारतीय/पश्चिम विभागीय / साउथ वेस्ट झोन/ क्रीडा महोत्सव/ खेलो इंडिया स्पर्धेमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे खेळाडू / संघ सहभागी होत असतात. याकरिता आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षी महाविद्यालयाचे जेष्ठता यादीनुसार आंतर महाविद्यालयीन स्पर्धेचे यजमानपद दिले जाते. सदर यजमानपद स्वीकारलेल्या महाविद्यायास विद्यापीठाकडून रु.२५,०००/- इतके अनुदान देण्यात येते. तरी दि.१०/०७/२०२४ रोजीच्या क्रीडा व शारीरिक मंडळाचे (BOS-PE) बैठकीच्या ठराव क्र.२ मध्ये यजमानपद स्वीकारलेल्या महाविद्यायास रु.२५,०००/- ऐवजी रु.५०,०००/- अनुदान देण्यात यावे असे सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदर बाब व्यवस्थापन परिषदेमध्ये ठेवण्यात यावी, असा ठराव झालेला आहे.<br>सबब, उक्त ठरावाच्या अनुषंगाने आंतर महाविद्यालयीन विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्याकरिता यजमानपद स्वीकारलेल्या महाविद्यालयास सन २०२४-२५ पासून विद्यापीठाचे अनुदान रु.२५,०००/- ऐवजी रु.५०,०००/- देण्याची बाब विचारार्थ. | क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग |
| ठराव: | **आंतर महाविद्यालयीन क्रीडा परिषदेचे यजमान पद स्वीकारलेल्या महाविद्यालयास सन २०२४-२५ पासून विद्यापीठाकडून रु.२५,०००/- ऐवजी रु.५०,०००/- इतके अनुदान देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[१४]</td><td>विद्यापीठातील विविध संकुले व विभागाकडील खराब/कालबाह्य झालेल्या अनावर्ती साहित्याचे निर्लेखन करण्यासाठी निर्लेखन समितीच्या शिफारस अहवालाप्रमाणे साहित्य निर्लेखन करावयाची बाब विचारार्थ<br>टिपणी: विद्यापीठातील विविध संकुले व विभागाकडील खराब/कालबाह्य झालेल्या अनावर्ती साहित्य निर्लेखन करण्यासाठी निर्लेखन सामिती यांचेकडून खालील प्रमाणे शिफारस अहवाल प्राप्त झालेला आहे.<br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>संकुलाचे नांव</th><th>घसारा वजा जाता साहित्यांची किंमत रुपये</th></tr>
<tr><td>१</td><td>रसायनशास्त्र संकुल</td><td>६,६४,९९७/-</td></tr>
<tr><td>२</td><td>शास्त्रीय उपकरण केंद्र</td><td>१०,००४/-</td></tr>
<tr><td>३</td><td>पदार्थ विज्ञान संकुल</td><td>२,२१,७४१/-</td></tr>
<tr><td>४</td><td>परीक्षा व मुल्यमापन मंडळ</td><td>८१,४५९/-</td></tr>
<tr><td>५</td><td>कुलसचिव कार्यालय</td><td>३,१२०/-</td></tr>
<tr><td>६</td><td>वाणिज्य व व्यवस्थापन संकुल</td><td>२७,४५३/-</td></tr>
<tr><td>७</td><td>संगणकशास्त्र संकुल</td><td>४३,८३८/-</td></tr>
<tr><td>८</td><td>ज्ञानस्त्रोत केंद्र</td><td>१३,२९३/-</td></tr>
<tr><td>९</td><td>राष्ट्रीय सेवा योजना</td><td>३,०९४/-</td></tr>
<tr><td>१०</td><td>आरोग्य केंद्र</td><td>११,२४५/-</td></tr>
<tr><td>११</td><td>भूशास्त्र संकुल</td><td>९६,२६८/-</td></tr>
<tr><td></td><td>एकूण रुपये</td><td>११,७६,५१२/-</td></tr>
</table>
विविध संकुले व प्रशासकीय विभाग यांच्याकडुन साहित्य निर्लेखन करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यानुसार सदर साहित्याचे निर्लेखन करण्यासाठी दि.०८/०६/२०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेतील ठराव क्र.२१(७) अन्वये नियुक्त केलेली पडताळणी समितीने प्रत्यक्ष जागेवर जावून पडताळणी करुन सदर साहित्य व उपकरणे निर्लेखन करण्याची शिफारस केली आहे. सोबत अहवाल जोडला आहे.<br>निर्लेखन करण्यासाठी समान लेखा संहिता (Common Account Code) मधील Appendix-I मध्ये Financial Delegation Power नुसार अधिकार दिले असून त्यामधील I (xvi & २ (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेने निर्लेखन नियमावलीमध्ये अनावर्तित बाबीसाठी रु.५०,०००/- वर असल्याने व्यवस्थापन परिषदेस निर्लेखन प्रस्तावास मंजूरी देण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.<br>सबब, निर्लेखन समितीच्या शिफारस अहवालाप्रमाणे विद्यापीठातील विविध संकुले व विभागाकडील खराब/कालबाह्य झालेल्या अनावर्ती साहित्याचे निर्लेखन करावयाची बाब विचारार्थ.</td><td>वित्त व लेखा विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>विद्यापीठातील विविध संकुले व विभागाकडील खराब/कालबाह्य झालेल्या अनावर्ती साहित्याचे निर्लेखन करण्यासाठी निर्लेखन समितीच्या शिफारस अहवालाप्रमाणे साहित्य निर्लेखन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१५] | **दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार, दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "ड" ते गट "अ" च्या निम्नस्तरापर्यंत पदांना (Lowest rung of Group "A") मधील पदांवर पदोन्नतीमध्ये दि.३०/०६/२०१६ पासून दिव्यांग आरक्षण लागू करण्याबाबतचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: दिव्यांग-२०२२/प्र.क्र.८३/१६-अ दि.२९ जुलै, २०२४ माहितीस्तव.**<br>टिपणी: उक्त शासन निर्णयान्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "ड" ते गट "अ" च्या निम्नस्तरापर्यतच्या पदांना (Lowest rung of Group "A") पदोन्नतीमध्ये दिव्यांग आरक्षणाबाबतच्या सुधारित सुचना हे दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना गट ड ते गट अ च्या निम्नस्तरापर्यंतच्या पदांमध्ये पदोन्नतीमध्ये ४ टक्के या प्रमाणात आरक्षण दि.३०/०६/२०१६ पासून लागू करण्यात येत आहे. सदर आरक्षण पूर्वलक्षी प्रभावाने लागू करताना खालील नमूद कार्यपध्दतीचा अवलंब करावा, असे उक्त शासन निर्णयान्वये कळविले आहे. ते खालीलप्रमाणे:<br>१) दिव्यांग कर्मचाऱ्यांना दि.२०/०४/२०२३ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या पात्रता अटींच्या पूर्ततेच्या आधीन राहून, दि.३०/०६/२०१६ पासून काल्पनिक पध्दतीने (Notional Basis) गट अ च्या निम्नस्तरापर्यंत पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा.<br>२) दि.३०/०६/२०१६ पासून ज्या दिनांकाला दिव्यांग अधिकरी/कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र ठरेल त्या दिनांकापासून त्यांना काल्पनिक रित्या पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ देण्यात यावा. पदोन्नतीचा प्रत्यक्षात आर्थिक लाभ त्यांना प्रत्यक्षात पदभार स्वीकारल्याच्या तारखेपासून लागू होईल.<br>३) दिव्यांग कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी दि.३०/०६/२०१६ पासूनच्या पदोन्नतीसाठी विचार केल्यामुळे, पदोन्नती साखळीतील inter-se-seniority वर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ज्येष्ठतायाद्यांमध्ये सुधारणा होवून प्रशासकीय गैरसोय होऊ शकते. अशी परिस्थिती टाळण्यासाठी दि.३०/०६/२०१६ नंतर मान्यता देण्यात आलेल्या प्रत्येक निवडसूचीतील पदसंख्येनूसार व दि.२०/०४/२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार, प्रत्येक शासकीय आस्थापना/ नियुक्ती प्राधिकारी यांनी दिव्यांग आरक्षणाची गणना करावी. सदर निवडसूचीमध्ये पात्र दिव्यांगांची संख्या पुरेशी नसल्यास अशा दिव्यांग कर्मचाऱ्यासाठी अधिसंख्य पद निर्माण करावे. अधिसंख्य पदाची निर्मिती, दिव्यांग कर्मचाऱ्यासाठी वैयक्तिक स्वरूपाची असेल.<br>४) उपरोक्त प्रमाणे निडसूचीनिहाय दिव्यांग पदांची गणना करून, दिव्यांगांची बिदूनामावली (Vacancy Base) सुधारीत करावी. त्याला प्रचलित कार्यपध्दतीनुसार संबंधीत मागासवर्ग कक्षाची मान्यता घेण्यात यावी.<br>५) त्यानंतर दिव्यांगांच्य अतिरिक्त निवडसूचीस प्रचलित कार्यपध्दतीनुसार आस्थापना मंडळ/ विभागीय पदोन्नती समितीची मान्यता घेण्यात यावी.<br>६) दि.३०/०६/२०१६ पासून सुधारीत आरक्षण निश्चिती करताना, दि.२०/०४/२०२३ पूर्वी दिव्यांग पदोन्नतीसंदर्भात अस्तित्वात असलेल्या धोरणानुसार (दि.०५/०३/२००२ व दि.०५/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार) प्रत्यक्षात देण्यात आलेल्या दिव्यांग पदोन्नत्या बाधित होणार नाहीत यांची दक्षता घ्यावी. आवश्यकतेनुसार संबंधित निवडसूचीमधील रिक्तता विचारात घेवून अन्य दिव्यांग प्रकारातील दिव्यांग उमेदवाराचे अंतर्गत परिवर्तनाने अन्य पात्र दिव्यांग प्रकारच्या उमेदवारामधून समायोजन करावे.<br>७) अतिरिक्त निवडसूचीमधील दिव्यांग कर्मचाऱ्यास सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार अधिसंख्य पद मिर्मिती करून समावून घेण्यासाठी वित्त विभागामार्फत उच्चस्तर सचिव समितीपुढे प्रस्ताव सादर करवा.<br>८) दिव्यांगासाठी अ.क्र.३ मधील तरतूदींनुसार, अधिसंख्य पदांच्या निर्मिती करण्याची जबाबदारी प्रशासकीय विभागाची राहील. विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील आस्थापनाचे अधिसंख्य पदांच्या निर्मितीच्या प्रस्तावांची पडताळणी करून वित्त विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करावी. | विशेष कक्ष विभाग |

९) विभागीय परीक्षा/विभागीय स्पर्धा परीक्षा या मार्गाने होणाऱ्या पदोन्नतीसह, इतर प्रचलित मार्गांनी झालेल्या पदोन्नती प्रक्रियांमध्ये दिव्यांगांना काल्पनिक पदोन्नतीचा लाभ देण्यात यावा.

१०) दि.३०/०६/२०१६ नंतर पदोन्नतीसाठी घेण्यात आलेल्या विभागीय परीक्षा/विभागीय स्पर्धा परीक्षांमधून पात्र दिव्यांगांची निवड करण्यात यावी. दिव्यांग उमेदवारांच्या पात्रतेचे मूल्यमापन करण्यासाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्र परीक्षा घेण्यात यावी.

११) विहित दिव्यांगत्व असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता दिव्यांग आरक्षणाची पदे निश्चित करताना त्या-त्या संवर्गासाठी विहित केलेल्या प्रमाणात एका निवडसूची (भरती) वर्षातील रिक्त पदांवर गणना करण्यात यावी.

१२) दिव्यांग आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाप्रमाणे एकाकी पदाला दिव्यांग आरक्षण लागू राहणार नाही.

१३) एखाद्या संवर्गात/ गटात दिव्यांगत्वाच्या सर्व प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली किंवा कमी प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली तरी जेवढया प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली आहेत त्यासाठीचे एकूण आरक्षण ४ % एवढेच राहील. कमी प्रकारासाठी पदे सुनिश्चित केली म्हणून आरक्षणाचे एकूण प्रमाण कमी करण्यात येणार नाही.

१४) दिव्यांग कर्मचाऱ्यांचा दि.३०/०६/२०१६ पासून पदोन्नतीसाठी विचार करताना शासनाने वेळोवेळी केलेले पदोन्नती संबंधातील नियम, आदेश व निकष (उदा. पदोन्नतीलगतच्या पदावरील किमान सेवेचा कालवधी, विहित विभागीय/सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा, गोपनीय अहवाल इ.) दिव्यांग कर्मचाऱ्याने पूर्ण करणे आवश्यक आहे.

१५) दिव्यांग आरक्षणानुसार पदोन्नतीसाठी पात्र दिव्यांग कर्मचारी यांना निवडसूची मध्ये रिक्त पद उपलब्ध होईपर्यंत अधिसंख्य पद निर्माण करावे अथवा समायोजन करावे. सदर अधिसंख्य पद हे दिव्यांग कर्मचारी संवानिवृत्ती, पुढील पदोन्नती अथवा इतर कोणत्याही कारणाने होणारी रिक्तता यापैकी जे आधी असेल त्या दिनांकाला व्यपगत करण्यात यावे.

१६) प्रत्येक शासकीय आस्थापनेने दि.२०/०४/२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील अ.क्र.१३ नुसार "संपर्क अधिकारी" व अ.क्र.१५ नुसार "तक्रार निवारण अधिकारी" नियुक्त करुन सदर अधिकारी यांनी आढावा घेवून, कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

१७) ज्यांना कायद्याच्या विविध न्यायालयांच्या आदेश/निर्णयांच्या अनुषंगाने वैयक्तिकरित्या पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ देण्यात आला आहे अशा प्रकरणी काल्पनिक पदोन्नतीचा लाभ संबंधित दिव्यांग उमेदवारांवर विपरित परिणाम करणार नाही.

सबब, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार, दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "ड" ते गट "अ" च्या निम्नस्तरापर्यत पदांना (Lowest rung of Group "A") मधील पदांवर पदोन्नतीमध्ये दि.३०/०६/२०१६ पासून दिव्यांग आरक्षण लागू करण्याबाबतचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: दिव्यांग-२०२२/प्र.क्र.८३/१६-अ दि.२९ जुलै, २०२४ माहितीस्तव.

ठराव: **दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार, दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "ड" ते गट "अ" च्या निम्नस्तरापर्यत पदांना (Lowest rung of Group "A") मधील पदांवर पदोन्नतीमध्ये दि.३०/०६/२०१६ पासून दिव्यांग आरक्षण लागू करण्याबाबतचा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक: दिव्यांग-२०२२/प्र.क्र.८३/१६-अ दि.२९ जुलै, २०२४ ची नोंद घेण्यात आली.**

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१६(१)] | **प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शैक्षणिक संकुलातील शिक्षकांसाठी संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी संकुलांतील संशोधक शिक्षकांकरीता, सद्यस्थितीत असणारे Seed Money for Research अंदाजपत्रकीय तरतूद रु.२५,००,०००/- या मधून रु.१२,००,०००/- Seed Money for Research of Schools हे नव्याने अंदाजपत्रकीय शिर्षक तयार करुन वर्ग करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: आयक्युएसी विभागामार्फत दि.०३/०७/२०२४ रोजी Internal Quality Assurance Cell (IQAC) Committee Member, Chairman of the Criterion I to VII and Director of all the Schools यांची एकत्रितरित्या बैठक संपन्न झाली. सदरच्या बैठकीत Criterion wise चर्चाकरीता असताना Criterion- III च्या अनुषंगाने मा.कुलगुरु महोदयांनी प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शैक्षणिक संकुलातील शिक्षकांच्या संशोधन कार्याकरीता वित्त व लेखा विभागाकडील अंदाजपत्रकात स्वतंत्र Seed Money चे शिर्षक निर्माण करून भरीव अशी तरतुद ठेवण्याबाबत निर्देश देण्यात आले.<br>याअनुषंगाने सादर करण्यात येते की, शैक्षणिक, संशोधन व विकास या विभागाअंतर्गत शिक्षक मान्यता विभाग २ या विभागाकडुन Seed Money ची रक्कम महाविद्यालयातील संशोधक शिक्षकांना स्वतंत्ररीत्या प्रस्ताव मागवून अनुदान देण्यात येते, त्याकरीता चालू आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रकीय तरतुद रु. २५,००,०००/- इतकी करण्यात आलेली आहे, तथापि विद्यापीठ संकुलातील संशोधक शिक्षकांसाठी Seed Money of Research for Schools हे शिर्षक अंदाजपत्रकात नव्याने निर्माण करून त्याखाली पुर्वीच्या रु. २५,००,०००/- तरतुदीमधून रु. १२,००,०००/- इतकी रक्कम चालु वर्षाच्या अंदाजपत्रकात वर्ग करण्याचे मा. कुलगुरु महोदय यांनी आयक्युएसी बैठकीत निर्देश दिल्याप्रमाणे आवश्यक आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शैक्षणिक संकुलातील शिक्षकांसाठी संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी संकुलांतील संशोधक शिक्षकांकरीता, सद्यस्थितीत असणारे Seed Money for Research अंदाजपत्रकीय तरतूद रु. २५,००,०००/- या मधून रु. १२,००,०००/- Seed Money for Research of Schools हे नव्याने अंदाजपत्रकीय शिर्षक तयार करुन वर्ग करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | आयक्युएसी विभाग |
| ठराव: | सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१६(२)] | **प्रस्तुत विद्यापीठात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्र संदर्भात कृती समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ.** | आस्थापना विभाग |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात मा. राजा उर्फ सुधाकर तुकाराम सरवदे अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य यांनी दि.२९/०७/२०२४ रोजीच्या पत्रानुसार आपल्या विद्यापीठामध्ये "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्र मंजूर करण्यात आले आहे. सदरच्या अध्यासन केंद्रासाठी खालीलप्रमाणे कृती समिती गठीत करावे जेणेकरुन सदर अध्यासन केंद्राचे कामकाज तत्परतेने पार पाडता येईल असे नमूद करुन कृती समितीमधील विवरण खालीलप्रमाणे दर्शविले आहे.

कृती समिती

| अ. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | मा. राजा उर्फ सुधाकर तूकाराम सरवदे | अध्यक्ष |
| २) | प्रा. (डॉ.) अशोक आर. शिंदे | समन्वयक |
| ३) | प्रा. (डॉ.). दिगंबर महादेव झोंबाडे | सदस्य |
| ४) | प्रा. (डॉ.). परमेश्वर सिद्राम हाटकर | सदस्य |
| ५) | प्रा. (डॉ.) किशोर नागनाथ जोगदंड | सदस्य |
| ६) | प्रा. (डॉ.) दिपक काशीनाथ रेडे | सदस्य |
| ७) | प्रा. (डॉ.) मारुती दगडू शिंदे | सदस्य |
| ८) | प्रा. (डॉ.) धनजंय साठे | सदस्य |
| ९) | प्रा. (डॉ.) भगवान नाईकनवरे | सदस्य |
| १०) | प्रा. (डॉ.) कल्याण साठे | सदस्य |

याबाबत सादर करण्यात येते की, विद्यापीठ प्रशासनाने गठीत केलेल्या समितीने दि.१९/०९/२०१८ रोजी शाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्राचा मसुदा या कार्यालयास सादर केला. तद्नंतर दि.२९/१०/२०१८ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विषय क्र. ४९ अन्वये, विषय ठेवला असता विद्यापरिषदेने खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

"लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्या प्रस्तावाचा गठीत समितीने सादर केलेल्या मसुद्यास शासनाची मान्यता मिळण्यासाठी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली."

सदर ठरावाच्या अनुषंगाने दि.०६ डिसेंबर, २०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र. २२ अन्वये, विषय ठेवला असता, व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

"लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्या प्रस्तावाचा गठीत समितीने सादर केलेला मसुदा शासनाची मान्यता मिळण्यास्तव पाठविण्याकरिता विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच प्रस्ताव शासनाकडे सादर करताना आर्थिक अनुदानाच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली."

तद्नंतर प्रस्तुत कार्यालयाचे जा. क्र. सोविसो/आस्था/२०१८/ ११२२५, दि.३१ डिसेंबर, २०१८ अन्वये, १) मा. विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर २) मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे आणि ३) मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. पंरतु शासनाकडून याबाबत कसल्याही प्रकारचे उत्तर अप्राप्त आहे.

सबब, सदर प्रस्तावाच्या पुढील कार्यवाहीसाठी उपरोक्त कृती समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** प्रस्तुत विद्यापीठात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्र संदर्भात खालीलप्रमाणे कृती समिती गठीत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | समिती सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | डॉ. दिगंबर महादेव झोंबाडे | अध्यक्ष |
| २) | डॉ. अशोक आर. शिंदे | समन्वयक |
| ३) | श्री. राजा उर्फ सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य |
| ४) | डॉ. परमेश्वर सिद्राम हाटकर | सदस्य |
| ५) | डॉ. किशोर नागनाथ जोगदंड | सदस्य |
| ६) | डॉ. दिपक काशीनाथ रेडे | सदस्य |
| ७) | डॉ. मारुती दगडू शिंदे | सदस्य |
| ८) | डॉ. धनजंय साठे | सदस्य |
| ९) | डॉ. भगवान नाईकनवरे | सदस्य |
| १०) | डॉ. कल्याण साठे | सदस्य |

श्री. सुधाकर तुकाराम सरवदे यांनी अध्यक्षांच्या परवानगीने खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१६(३)] | **दि.२२ ते २८ जुलै दरम्यान पीएच.डी. कोर्स वर्कच्या झालेल्या परीक्षेसंदर्भातची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. सुधाकर तुकाराम सरवदे यांनी दि.१६/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठात दि.२२ ते २८ जुलै, २०२४ दरम्यान पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा झाली असून सदर परीक्षेबाबत खालील प्रश्नांची माहिती व्यवस्थापन परिषद बैठकीमध्ये आयत्या वेळेचा विषय घेण्यात यावा असे कळविले आहे.<br>१) परिक्षेत एकूण विद्यार्थी संध्या किती?<br>२) सर्वाचे परिक्षा केंद्र वेगळे होते का?<br>३) परीक्षा सुरु होण्यापूर्वी वेळापत्रकात किती परीक्षा केंद्र देण्यात आले होते?<br>४) न्यु सातारा बी.सी.ए. कॉलेज, पंढरपूर मध्ये पीएच.डी. चे विद्यार्थी आहेत का?<br>५) यापूर्वी कोर्सवर्क परिक्षेत Wrotter देण्यात आला आहे का?<br>६) प्राध्यापक लक्ष्मणराव कोंडिबा ढोबळे यांना परीक्षा केंद्र कोणते देण्यात आले होते?<br>७) प्राध्यापक लक्ष्मणराव कोंडिबा ढोबळे यांना Writter देण्यात आला आहे का?<br>८) Writter असणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पात्रता काय?<br>९) जुलै च्या परिक्षेत वरील कालावधीत किती विद्यार्थ्यांना लेखनिक (Writter) देण्यात आला आहे?<br>१०) प्राध्यापक लक्ष्मणराव कोंडिबा ढोबळे हे दिव्यांग प्रकारात येतात का?<br>११) प्राध्यापक लक्ष्मणराव कोंडिबा ढोबळे या विद्यार्थ्यांचा पत्ता कोणता?<br>१२) परीक्षा केंद्रासाठीची असलेली नियमावली?<br>या सर्व प्रकारामुळे मंगळवार, दि.१३/०८/२०२४ च्या झी न्युज चॅनलवर आलेली बातमी खरी आहे का?<br>सबब, श्री. सुधाकर तुकाराम सरवदे यांनी दि.१६/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये वरीलप्रमाणे मागणी केलेली माहिती विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग |
| ठराव: | **दि.२२ ते २८ जुलै, २०२४ दरम्यान पीएच.डी. कोर्स वर्कच्या झालेल्या परीक्षेसंदर्भात विद्यापीठाने केलेली सर्व प्रक्रिया ही नियमानुसार केली असल्याने यासंदर्भात परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाकडून पत्रकार परिषद घेऊन विद्यापीठाची बाजू मांडण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.** | |

श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी अध्यक्षांच्या परवानगीने खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१६(४)] | विविध संलग्नित महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेले नियमित ग्रंथपाल पद भरेपर्यंत सदर पद तासिका तत्वावर भरण्याची बाब विचारार्थ. | शिक्षक मान्यता विभाग |
| ठराव: | विविध संलग्नित महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेले नियमित ग्रंथपाल पद भरेपर्यंत सदर पद तासिका तत्वावर भरण्यास मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या मान्यतेच्या अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद